Impact Factor – 6.625

E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFEREED & INDEXED JOURNAL

April 2021

Special Issue 265




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar.
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

TRUE COPY

PRINCIPAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 265 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April- 2021

## हिंदी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 26 | आदिवासी समाज का अस्तित्व | अप्पासाहेब जगदाले | 138 |
| 27 | संत कबीरदास के काव्य में युग चेतना | प्रा.हिरा पोटकुले | 141 |
| 28 | कबीर वाङ्मय और उसकी प्रामाणिकता | डॉ. महेन्द्रसिंह पवार | 145 |
| 29 | विद्यापति का साहित्य 'विभागसार' - स्त्रीधनाधिकार और उपयोग - वर्तमान परिप्रेक्ष्य में। | डॉ. प्रियंका कुमारी | 149 |
| 30 | अमृता प्रीतम के अनुदित उपन्यासो मे प्रेम का स्वरूप | डॉ. शोभा रावत | 156 |
| 31 | स्त्री जीवन और सुधा ओम ढींगरा की कहानिया | अनिता देवी | 167 |
| 32 | विश्व पटल पर हिंदी की स्थिति और प्रासंगिकता | डॉ. विष्णू राठोड | 171 |
| 33 | हिंदी काव्य साहित्य मे व्यष्टी - समष्टी : बोध, अर्थ एवं स्वरूप | डॉ. जगदीश परदेशी | 176 |
| 34 | मंदिर के बदले सेवाश्रम बनाने का संदेश देती कहानी - 'फाइल' | डॉ. गजानन भोसले | 181 |
| 35 | थारु जनजाति का आर्थिक, सामाजिक एवं ऐतिहासिक अध्ययन | डॉ. विमला देवी | 187 |
| 36 | फादर पीटर पॉल एक्का के कहानी साहित्य मे आदिवासी चेतना : 'राजकुमारों के देश में' इस कहानी संग्रह के विशेष संदर्भ में | प्रा. हर्षल बच्छाव, डॉ. अनीता नेरे | 196 |
| 37 | हिन्दी ग़ज़ल में फ़िक्र और ज़िक्र | डॉ. ज़ियाउर रहमान जाफरी | 201 |
| 38 | वैद्यकीय आचारसंहिता : एक तात्त्विक चिंतन | डॉ.राजेसाहेब मारडकर | 205 |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 39 | आदिवासींच्या विकासाकरिता महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना : उद्देश व स्वरुप | डॉ. चंद्रकांत गोंधळी | 211 |
| 40 | वारकरी साहित्यातील अंधश्रद्धा निर्मूलन विषयक विचार | श्री. जालिंदर येवले | 217 |
| 41 | संत नामदेवांची समाजाभिमुखता | प्रा. डी. एम. बहूरे | 222 |
| 42 | चोखियाची महारी : संत सोयराबाई | डॉ. प्रमोद गारोडे | 225 |
| 43 | किशोर सानप लिखित 'समग्र तुकाराम दर्शन' : एक सांक्षेपी स्वरुपाची मांडणी | प्रा. बालासाहेब कटारे | 231 |
| 44 | वाकाटक कालीन चित्रकला | डॉ. जी. एस.पाटील | 234 |
| 45 | राग यमन व चित्रपट गीत – संगीत | डॉ. सरिता इंगळे | 241 |
| 46 | मानवतेचा संदेश देणारे 'प्रकाशवाटा' | सुनिल खैरनार, डॉ. उज्वला देवरे | 245 |
| 47 | समकालीन ग्रामीण कादंबरीतील समाजदर्शन | डॉ. शारदा मोरे | 248 |
| 48 | विसाव्या शतकातील आदिवासी साहित्य | डॉ. अंजली मस्करेन्हस | 253 |
| 49 | 'कापुसकाळ' या कादंबरीतील शेतकऱ्यांच्या समस्या | डॉ. किशोर पाठक | 259 |
| 50 | मराठी ग्रामीण कथांचा अभ्यास (१९२५ ते १९५० या कालखंड) | विनोद भालेराव, डॉ.अक्षय घोरपडे | 262 |
| 51 | नव्वदोत्तर स्त्रियांच्या मराठी कवितेतील स्त्रीवादी विचार | डॉ. संजय पाटील | 266 |
| 52 | साहित्य अकादमी पुरस्कृत कवितासंग्रहाची वाङ्मयीन आणि भाषिक वैशिष्ट्ये | प्रा.भारती सोनवणे | 275 |
| 53 | मनाने व मनगटाने घट्ट कसं व्हावं? हा संदेश देणारे आत्मचरित्र 'झेप' : एक आकलन | डॉ. भाऊसाहेब गमे | 283 |
| 54 | महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळी आणि महात्मा फुले | डॉ. मारोती घुगे | 289 |
| 55 | लोकमान्य टिळक यांचे चतु:सूत्री आंदोलन : एक राष्ट्र बांधणीचा मार्ग | डॉ. राजू सावंत | 297 |
| 56 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास | डॉ. संजय पाटील | 303 |
| 57 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान | डॉ. लता आंदे | 309 |




TRUE COPY
PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019),
Special Issue - 265 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April- 2021

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान

प्रा. डॉ लता दिगंबर आंदे
शंकरराव जगताप आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज,वाघोली.
ता.कोरेगाव , जि.सातारा.४१५५२५
मो.नं. ९४२०८०८९६१
andelata67@gmail.com

**प्रस्तावना:**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर थोर विचारवंत, समाजसेवक, समाजसुधारक, अर्थतज्ञ , घटनातज्ञ व भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून भारतात व जगात ओळखले जाते. आधुनिक भारताचे निर्माते,भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार व समस्त भारतीयांचे उद्धारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अधिक माहिती जाणून घेण्यासाठी व भारतीय संविधानाचा अभ्यास करणे अधिक गरजेचे आहे. म्हणून मी 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधान' या विषयावर शोध निबंध सादर करीत आहे. तो पुढीलप्रमाणे.

**१.घटना समितीची निर्मिती :**

१९३४ मध्ये स्वराज्य पार्टीने घटना समिती तयार केली जावी ही मागणी केली.[१] १९४० मध्ये ब्रिटिश सरकारने प्रथमत: ८ ऑगस्ट घोषणेद्वारा भारतीय घटना निर्मितीसाठी घटना समिती असावी हे अप्रत्यक्षपणे मान्य केले.[२] १९४२ च्या क्रिप्स मिशन ने स्वतंत्र भारताचे संविधान निर्माण करण्याची जबाबदारी ही प्राय : नव्हे तर संपूर्णता भारतीयांचीच असेल हे मान्य केले.[३] १६ मार्च १९४६ च्या कॅबिनेट मिशनच्या शिफारशींनी भारताची घटना समिती तयार करण्याची पद्धत ठरली.

TRUE COPY

**२.डॉ. बाबासाहेब यांचा घटना समिती प्रवेशास विरोध :**

डॉ.बाबासाहेब हे दलितांचे प्रखर समर्थक आणि त्यांच्या चळवळीचे पाठीराखे होते. ते महात्मा गांधी आणि काँग्रेसचे विरोधक होते. म्हणून त्यांना घटना समितीत प्रवेश मिळू नये यासाठी म.गांधीच्या निष्ठावंत मंडळींनी मुंबई प्रांतात त्यांच्या विरोधात प्रचंड मोर्चा बांधणी करून ठेवली. गोलमेज परिषदेतील बाबासाहेबांचे प्रखर निवेदन व त्यामुळे मिळविलेला 'जातीय निवाडा' यावरून गांधी आणि आंबेडकर यांच्यात अप्रत्यक्ष मतभेद झाले होते.[४]

**३. डॉ. बाबासाहेब यांचा घटना समितीत प्रवेश:**

डॉ.बाबासाहेब आणि गांधी यांच्यातील वैचारिक मतभेदाचा परिणाम म्हणूनच मुंबई विधीमंडळ प्रांतात त्यांना निवडून जाता आले नाही. पण त्यावेळचे बंगालचे शेड्युल्ड कॉस्ट फेडरेशनचे आमदार जोगेंद्रनाथ मंडल यांनी बंगाल विधानसभेत काँग्रेसच्याच सुमारे २५ दलित सदस्यांना फोडून तसेच ४ अपक्ष सदस्य व काही मुस्लीम सदस्यांची मते फिरवून डॉ.बाबासाहेबांना प्रचंड बहुमताने घटना समितीवर निवडून दिले.[५] १९४६ च्या अखेरीस बंगालच्या विधिमंडळाने त्यांची संविधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड केली. पुढे ते संविधानाच्या मसुदा समितीचे प्रमुख झाले.स्वतंत्र भारताचे पहिले विधिमंत्री झाले. पण हिंदू कोड बिलाच्या प्रश्नावरून नेहरूंशी मतभेद होऊन ते बाहेर पडले.[६]

**४. घटना समितीची पहिली बैठक :**

घटना समितीची पहिली बैठक ९ ते २३ डिसेंबर १९४६ रोजी नवी दिल्ली येथील 'संविधान सभागृह' मध्ये पार पडली. हे सभागृह सध्या 'सेंट्रल हॉल' या नावाने परिचित आहे. पहिल्या बैठकीला ९,



PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS & ... COLLEGE

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019), | April- 2021
Special Issue - 265 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal

महिला सदस्यासह २०७ सदस्य उपस्थित होते. समितीचे ५ वे अधिवेशन १४ ते ३० ऑगस्ट १९४७ मध्यरात्री भरविण्यात आले होते.[७]

संविधान सभेची स्थापना फ्रेंच प्रथेनुसार ६ डिसेंबर १९४६ ला झाली. घटना समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ मध्ये सच्चिदानंद सिन्हा यांचे अध्यक्षतेखाली सुरू झाली. ११ डिसेंबर १९४६ ला डॉ. राजेंद्रप्रसाद यांना संविधान सभेचे स्थायी अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. काही दिवसातच मुस्लिम लीगने घटना समितीवर बहिष्कार टाकला. तरीही समितीचे कामकाज चालुच होते. प्रारूप समितीने सतत आठ महिने काम करून भारतीय घटनेची रूपरेषा तयार केली. २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस परिश्रम करून २६ नोव्हेंबर १९४९ ला संपूर्ण घटना तयार झाली. त्याच दिवशी डॉ.राजेंद्रप्रसाद यांनी घटनेवर स्वाक्षरी केली.२४ जानेवारी १९५० ला घटना समितीची शेवटची बैठक झाली. त्यात डॉ.राजेंद्रप्रसाद यांची भारतीय गणराज्याचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड करण्यात आली.[८]

५. घटना समिती सदस्य :

भारतीय घटना निर्मितीसाठी भाररतातील विविध प्रांतसमाज सरंजाम ,अल्पसंख्याक इ.चे प्रतिनिधी म्हणून सुमारे २९६ सदस्य घटना समितीत निवडून गेले असले तरी या सगळयांना लिखाणाचे अथवा घटना प्रक्रियेचे कामकाज देता येणार नव्हते. म्हणून या सर्व सदस्यातून काही सदस्यांना घेऊन २९ ऑगस्ट १९४७ रोजी मसूदा समिती निर्माण करण्यात आली. मसूदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब होते. तर डॉ. राजेंद्र प्रसाद घटना समितीचे अध्यक्ष होते. १. अल्लादी कृष्णा स्वामी अय्यर २. एन गोपाल स्वामी अयगार ३. के.एन. मुन्शी ४. सय्यद मोहमद सादुला ५. बी.एल. मित्तल ६. डी.पी.खैतान असे एकूण ६ सदस्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबरोबर होते.[९]

३० ऑगस्ट १९४७ रोजी पहिली बैठक होऊन २७ ऑक्टोबर १९४७ पासून या समितीच्या प्रत्यक्ष बैठका व प्रक्रिये संदर्भात चर्चा सुरू झाल्या. संविधान समितीने १२ समित्या प्रमुख विषय संबंधात स्थापन केल्या. त्यात प्रारूप समिती ;क्तजिपदह ब्वउउपजजमम द्ध ही महत्वपूर्ण होती.[१०]

६.घटना समितीचे कामकाज :

उद्दिष्टांचा ठराव–घटना समितीची निर्मिती झाल्यानंतर अल्पावधीतच म्हणजे १३ डिसेंबर १९४६ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांनी घटना समितीपुढे उद्दिष्टांचा ठराव मांडला. घटना समितीने हा ठराव २२ जानेवारी १९४७ रोजी एकमताने मान्य केला. या ठरावातील उद्दिष्टे ७ आहेत. ते असे १. लिखित राज्यघटना २.संघराज्य तत्व, ३. सार्वभौम गणराज्य, ४. संसदीय लोकशाही स्वरूप, ५.राष्ट्रकुल राष्ट्रांच्या संघटनेचे सदस्य, ६.धर्मनिरपेक्ष, ७.कल्याणकारी हे सात उद्दिष्टे होते.[११]

भारतीय राज्यघटनेची वैशिष्टये :

भारतीय घटना एक वैशिष्टयपूर्ण दस्ताऐवज आहे. कॅबिनेट मिशन योजनेतर्गत संविधान सभा १९४६ ला स्थापन झाली होती. ती भारतीय नागरिकांची समिती होती.

१.लिखित व मोठी घटना :

भारतीय घटना ही जगातील सर्वात मोठी राज्यघटना म्हणून भारतीय घटनेकडे पाहिले जाते.२६ नोहेंबर १९४९ रोजी घटना समितीने स्वीकृत केलेले संविधान ३९५ कलमे,८ परिशिष्टे, आणि २० भागांनी मिळून बनलेले होते. सद्य:स्थितीत भारतीय घटनेत ३९५ कलमे, १२ परिशिष्टे आणि २२ विभाग अंतर्भुत

E-ISSN : 2348-7143
April- 2021

आहेत. [१२] कॅनडा १४७, ऑस्ट्रेलिया १२८, दक्षिण आफ्रिका १५३, चीन १०६, अमेरिकेच्या घटनेपेक्षा पाच पट मोठी, श्रीलंकेच्या घटनेपेक्षा दुप्पट मोठी ही घटना आहे.[१३]

२.ताठर व लवचिक यांचा मेळ :

साध्या पद्धतीने घटनेत बदल करता येत असल्यास संविधान लवचिक मानले जाते. तर घटनेत बदल करण्यासाठी विशेष पद्धतीची आवश्यकता असल्यास ताठर मानली जाते. ३६८ कलमानुसार ताठर व लवचिक यांचा मेळ घालण्यात आला.

३.सार्वभौम,समाजवादी,धर्मनिरपेक्ष,लोकशाही गणराज्य :

भारत हा अंतर्गत आणि बाह्य दृष्टीने सार्वभौम आहे. अंतर्गत तो सर्वोच्च तर बाह्य दृष्टीने तो स्वतंत्र आहे. या देशाने लोकशाही पद्धती स्वीकारली आहे. म्हणजे अंतिम सत्ता लोकांकडे आहे. आमची राज्यघटना लोकांकरिता,त्यांचे कल्याण साध्यण्याकरिता आणि समृद्धीकरीता आहे. प्रौढ मताधिकाराचा स्विकार केला.भारताने साम्यवादी आणि भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा सुवर्णमध्य साधून समाजवादी अर्थव्यवस्था स्विकारली. भारत हे सर्वधर्मसमभाव आहे. गणराज्य–भारतातील सर्वोच्च राजकीय पद निवडणुकीद्वारा कोणताही नागरिक प्राप्त करू शकतो. [१४]

४.जनतेचे सार्वभौमत्व :

'आम्ही भारतीय लोक .....' हे सरनाम्यातील प्रारंभिक शब्द स्पष्ट करते की, भारतीय राज्यव्यवस्थेत 'लोक' च सत्तेचा अंतिम स्त्रोत आहे. कारण लोक हेच सार्वभौम आहेत.

५. मूलभूत अधिकार :

भारतीय घटनेचे हे एक वैशिष्ट्य ठरते. घटनेने भारतीय नागरिकांना ६ मूलभूत अधिकार प्रदान केले ते पुढीलप्रमाणे–१.समतेचा अधिकार,२.स्वातंत्र्याचा अधिकार,३.शोषणाविरुद्धतेचे अधिकार,४.धर्मस्वातंत्र्याचा अधिकार, ५.संस्कृती व शिक्षणाचा अधिकार, ६. न्यायालयीन संरक्षणाचा अधिकार, भारतीय घटनेत विभाग ३ मध्ये कलम १२ ते ३५ या भागात मूलभूत हक्काविषयी विस्तृत तरतूदी आहेत.

६.मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश :

घटनेतील ४ थ्या भागामध्ये ३६ ते ५१ कलमे मार्गदर्शक तत्वे स्पष्ट करतात. डॉ. आंबेडकरांच्या मते, राज्य धोरणाची तत्त्वे ही राज्यघटनेचे 'उदात्त वैशिष्ट्य' आहे. सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी त्यांचा समावेश केलेला आहे. [१६]

७. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार :

लोकसभा आणि राज्यातील विधानसभांच्या निवडणुकीसाठी सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराचे तत्व स्विकारले आहे. जात, वंश, धर्म, लिंग, साक्षरता, संपत्ती व इतर कोणत्याही कारणाच्या आधारे भेदभाव न करता २१ वर्षे पूर्ण असणा–या सर्व भारतीय स्त्री–पुरूषांना घटनेने मताधिकार दिला. १९८८ साली ६१ व्या घटनादुरूस्तीने मतदानाचे वय २१ वरून १८ वर्षे करण्यात आले. यामुळे लोकशाहीचा पाया विस्तृत झाला. १९२८–२९ या कायद्याने सर्व नागरिकांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला. १९२८च्या कायद्याने पारंपारिक मालमत्तेचा आधार नाकारला गेला व सार्वत्रिक प्रौढ मतदानाचे तत्व अवलंबिले गेले.[१७]

८. स्वतंत्र न्यायव्यवस्था :

स्वतंत्र न्यायव्यवस्था हे लोकशाहीचे मूलतत्त्व आहे. नागरी हक्कांचे संरक्षण, शासनसंस्थांकडून घटनात्मक कारभाराची हमी, स्वराज्याचे संरक्षण आणि भिन्न प्रकारचे तंटे निवारण करण्यासाठी कोणत्याही



TRUE COPY
PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Ko... Dist-Satara

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019),
Special Issue - 265 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April- 2021

दबावापासून मुक्त अशी न्यायव्यवस्था अत्यावश्यक ठरते. घटनेत विविध तरतूदी करून स्वतंत्र न्यायपालिकेची हमी देण्यात आली आहे.

**९. नागरिकांचे कर्तव्य :**

१९७६ ला घटनेत ४२ वी दुरूस्ती करून नागरिकांचे कर्तव्य समाविष्ट करण्यात आले. नागरिकांची १० कर्तव्य सांगितली आहे. उदा.राज्यघटना,राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत याचा आदर करणे.

**१०.एकेरी नागरिकत्व :**

भारतीय घटनेनेएकेरी नागरिकत्व प्रदान केलेले आहे. कलम ५ ते ११ यामध्ये माहिती आहे. डॉ आंबेडकर यांच्यामते भारतात एकेरी नागरिकत्व आहे. भारतीय नागरिक भारताच्या कोणत्याही प्रदेशात राहात असला तरी त्याला समान अधिकार प्राप्त होतात. [१८]

**११.कल्याणकारी राज्य :**

भारतीय राज्यघटनेतून लोककल्याणकारी राज्याचे तत्वज्ञान प्रतिबिंबित होते.सरनाम्यात अंतर्भूत केलेले सामाजिक, आर्थिक न्याय तथा दर्जा व संधीची हमी देणारे समतेचे तत्व उद्दिष्ट अधोरेखित करतात.

**१२.संसदीय शासनव्यस्था :**

भारतीय संविधानात प्रातिनिधिक आणि संसदीय पद्धतीचा स्विकार केला आहे. याचा अर्थ देशाच्या राज्यकारभारात लोकप्रतिनिधिंनी बनविलेली संसद ही मध्यवर्ती असेल. संसदेतून मंत्रिमंडळाची निवड होईल आणि हे मंत्रिमंडळ संसदेच्या पाठिंब्यावर सत्तास्थानी राहील.त्यामुळेच या पद्धतीत पंतप्रधानास प्रमुखत्व बहाल केलेले आहे. [१९]

**१३.स्वतंत्र मंडळ /संस्था :**

राज्यघटनेने केवळ कार्यकारी मंडळ,कायदे मंडळ आणि न्याय मंडळाचीच निर्मिती केलेली नाही तर काही स्वतंत्र संस्था /मंडळाची निर्मिती केलेली आहे. उदा. निवडणूक आयोग, नियंत्रक व महालेखापरीक्षक ,केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्यलोक सेवा आयोग इत्यादी .

**१४.आणीबाणीविषयक तरतूदी :**

असामान्य आणि अनपेक्षित• परिस्थिती हाताळता यावी यासाठी राज्यघटनेने राष्ट्रपतीला आणीबाणीविषयक अधिकार दिलेले आहेत. भारताचे सार्वभौमत्व, एकता,अखंडता आणि देशाची सुरक्षितता तसेच लोकशाहीत्मक राजकीय व्यवस्था राज्यघटनेचे संरक्षण करण्याकरिता आणीबाणीविषयक अधिकाराची तरतूद केलेली आहे. राष्ट्रीय आणिबाणी कलम ३५२,राष्ट्रपती राजवट ३५६ आणि वित्तीय आणीबाणी कलम ३६० या तीन प्रकारच्या आणीबाणीची तरतूद भाग १८ मध्ये केलेली आहे.

**१५.मूलभुत कर्तव्य :**

मूळ राज्यघटनेत मूलभूत कर्तव्य समाविष्ट नव्हती. स्वर्णसिंह समितीच्या शिफारशीवरून १९७६ मध्ये ४२ व्या घटना दुरूस्तीने त्यांचा भाग ४ 'अ' कलम ५१ 'अ' मध्ये करण्यात आला. २००२ मध्ये ८६ घटना दुरूस्तीने ११ वे कर्तव्य समाविष्ट करण्यात आले. मार्गदर्शक तत्वाप्रमाणे न्याय प्रविष्ट नाही.

'भारतीय राज्यघटना हा अग्रगण्य असा सामाजिक दस्तऐवज आहे. यातल्या बहुतांशी तरतुदी आणि कलमे ही सामाजिक परिवर्तनाचे ध्येय गाठण्याच्या मार्गावर नेतात.तर काही तरतुदी योग्य बदल घडवण्यासाठी लागणारी परिस्थिती निर्माण होण्यासाठी प्रोत्साहित करतात, परंतु जरी संपूर्ण राज्यघटनेमध्ये राष्ट्राचे उत्थान आणि सामाजिक क्रांती ही उद्दिष्टे खोलवर झिरपू शकली नाहीत,तरी घटनेच्या भाग ३ व भाग ४ यातील

मुलभूत हक्क आणि राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे यांच्या मधू नही ध्येय दृष्टोत्पातीत येतात आणि ज्ञान या घटनेमधला सद्सदविवेकबुध्दीचा भाग आहे.'[१०]

निष्कर्ष :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे मसूदा समितीचे अध्यक्ष होते. यांच्या मदतीला सहा सदस्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटना २ वर्षे ११ महिने १८ दिवसात पूर्ण केली. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी एकूण ६४ लाख रूपये खर्च आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय जनतेला न्याय,स्वातंत्र्य, समता आणि बंधुता भारतीय घटनेच्या रूपाने बहाल केली. सरनाम्यात सामाजिक, आर्थिक न्याय तथा दर्जा व संधीची हमी देणारे समतेचे तत्व आहे. प्रौढांना मतदानाचा अधिकार, स्वतंत्र न्यायव्यवस्था, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे, संसदीय लोकशाही पद्धतीचा स्वीकार, जनतेचे सार्वभौमत्व, मूलभूत कर्तव्य, जनतेला लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार, आर्थिक समानता, भारत देश धर्मनिरपेक्ष आहे. एकेरी नागरिकत्व इत्यादी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या रूपाने बहाल केले. भारतीय राज्यघटना १९३५च्या कायद्यावर आधारीत आहे.

संदर्भ ग्रंथ :

१ प्रा.श्रीकांत वि.देशपांडे, 'भारताचे संविधान विकास,स्वरूप आणि राजकारण' श्री मंगेश प्रकाशन नागपूर,आ.१,१९९३,पृ.१
२ तुकाराम जाधव/महेश शिरापूरकर, 'भारतीय संविधान व भारतीय राजकारण' भाग १,द युनिक ॲकॅडमी,पुणे, आ.१,जुलै२०१२,पृ.२ आणि mpsckida.com.१५/०३/२०२१ रोजी पाहिले.
३ तुकाराम जाधव/महेश शिरापूरकर, पृ.[illegible]
४ डॉ.अनिल सिंगारे,'महाराष्ट्रातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास',अरूणा प्रकाशन,लातूर,आ.१,८जुलै २०१२,पृ.११५,११६
५ तत्रैव पृ.,११६
६ डॉ.भास्कर लक्ष्मण भोळे, 'भारतीय राजकीय विचारवंत', पी.बी.डी.प्रकाशन, नागपूर, जानेवारी २०१८, पृ.२०४
७ तुकाराम जाधव/महेश शिरापूरकर, पृ.२
८ प्रा.श्रीकांत वि.देशपांडे पृ.४,mr.m.wikipedia.org १५/०३/२०२१ रोजी पाहिले.
९ डॉ.अनिल सिंगारे पृ.११७
१० प्रा.श्रीकांत वि.देशपांडे पृ.३
११ तत्रैव पृ.३
१२ तुकाराम जाधव/महेश शिरापूरकर, पृ.६
१३ प्रा.श्रीकांत वि.देशपांडे पृ.१
१४ तत्रैव पृ.२२
१५ तत्रैव पृ.२३

TRUE COPY



PRINCIPAL
SHANKARRAO JAGTAP ARTS &
COMMERCE COLLEGE, WAGHOLI
Tal-Koregaon Dist-Satara.

१६ भारतीय संविधान ,भारत सरकार विधि,न्याय आणि ,कंपनीचे कार्य मंत्रालय, मुंबई,आ.१,२००२, पृ. १७,१८

१७ डॉ.रावसाहेब कसबे,'डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना', सुगावा प्रकाशन,पुणे,आ.५,जून २०१४,पृ.९५

१८ प्रा.श्रीकांत वि.देशपांडे पृ.२७, Dr.Ambedkar Constitution Assembly Debates.

१९ तुकाराम जाधव/ महेश शिरापूरकर, पृ.७

२० ग्रॅनव्हिल ऑस्टिन, 'भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशीला', डायमंड प्रकाशन,पुणे, २०१३,पृ.६२.